वि.दि.दा.क्र.१३२/२०२३
वामन वि. शिवाजी.
नि.क्र.२८.

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची उलटतपासणी प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. डी. जाधव यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–</u>**

३. मी जे.सी.बी. मशीन २०१५ पासून चालवितो. माझ्या मालकीची जेसीबी मशीन २०१५ पासून आहे. वादीच्या घरी मी कधी गेलो होतो त्याची तारीख मला सांगता येणार नाही. मी खड्डे खोदण्याचे काम प्रतिवादी यांच्या घरी घेतले होते. मी खड्डे खोदण्यासाठी गेलो त्यावेळी त्या ठिकाणी घर होते. मी खड्डे खोदले. त्या दोन खड्डयामध्ये अंतर ३ फुट होते. मी त्या घरामध्ये एकूण १७ खड्डे खोदले. तसेच एक बाथरुम व दुसरा संडासचे खड्डे खोदले. खड्डे खोदले त्याचे मटेरियल मी तेथेच बाजूला टाकले होते.

४. मी खड्डे खोदण्याचे काम कोणत्या तारखेला व कोणत्या महिन्यात सुरु केले त्याची तारीख व महिना मला अता आठवत नाही. प्रतिवादीने मला दोन टप्प्यात पैसे दिले. मी सदरचे काम तीन दिवसात पुर्ण केले. काम करतेवेळेस प्रतिवादीने मला रक्कम रुपये १५,०००/– दिले. नंतर रक्कम रुपये २५,०००/– दिले. प्रतिवादीचे घराचे नवीन बांधकाम झालेले आहे. प्रतिवादीच्या घराचे मुख्य द्वार दक्षिणेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा आहे.

उलट तपास पुर्ण.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

(पी. आय. मोकाशी)
दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.

दिनांकः–२६.०६.२०२४.